# Announcements and Appeals.

## Forth Coming Books

I. **Sri Sai Baba's Sayings** (in English)—a fairly full collection is being prepared for the press, to be printed in April. Those who have suggestions to offer for the arrangement of the sayings—or who wish to communicate special sayings known to them, which have not yet been published and those who are ready to translate Baba's golden sayings into their special vernaculars or publish the vernacular editions at their own expenses are welcome to communicate their ideas and views either to the editor Sai Lila or direct to the undersigned.

Suitable names for the work may also be suggested. So for the following names have been suggested—

1 **Gems from Shirdi Sai Baba.**
2 **Golden sayings & charters of Sai**
3 **Pearls from Sai's Lips**
4 **Nectar drops from Sai**
5 **The Wisdom of Sai**
6 **Sayings of Sai**
7 **Samasta Sai Vachanamrits**
8 **Sai Sudha Bindu**
9 **Sai Ratnamala**

II. A commentary on the 108 names Ashtottara Satha Namawali of Baba, on lines of the commentary on Vishnu Sahasranama is nearly ready for the press, in English. Translation and publication in other languages is welcome. Those who wish to translate or publish translation will be given advance copies of the English commentaries.

III. **Sai Baba's Album.**—being 108 pictures i.e. block prints on imitation art paper with footnotes giving one a quick survey of Baba and places and persons connected with Baba. Children and those who can not or will not go through bigger volumes can easily pick up a knowledge of the Salient facts of Baba's life and activities extending up to the present moment and imbibe faith which will enable them to reap benefits from Baba for themselves and their families.

Those who have authentic photos of Sai Baba and of all persons and places connected with Sai Baba are requested to send them to the undersigned—or to send at least a clear copy of the same that might be useful for making blocks.

Each copy of the album is expected to be sold at about 10 As. per copy. If any person can give advance orders for a good number, that might be useful—more especially if they advance the price. Remittances, if any, may be made to the Secy. Madras Sai Mandali, 55 Strotten Muthia Muladi St., Madras.

**B. V. N. Swami.**
President
Madras Sai Mandali.

162

# Acknowledgements & Reviews

We have received the following books and journals:—

## BOOKS ( for the A. C. Library )

(*a*) From Mr. A. Venkatanna, Sampige Road, Malleswaram, Bangalore.

| | | |
|---|---|---|
| **The Serpent Power** | | by Arthur Avalon. |
| **The Masters and the Path** | ... | C. W. Leadbeater |
| **Starlight** | ... | do |
| **Legends and Tales** | ... | Annie Beasant |
| **Vade Macum to man** | ... | A. Schwarz |

(*b*) From B. V. Narsimha Swami
**169 English and 43 Vernacular books.**

(*c*) From Mylapore Maratha Education Fund.
(1) **Souvenir of Silver Jubilee of M. M. E. Fund** (English)
(2) „ „ „ „ (Marathi)

(*d*) From Shri R. Vasudeo Rao B. A., B. L. President, Suddha Dharma Mandalam, Kutcherry Street, Mylapore, Madras.
(1) **Bhagawad Gita** ... Edition by Suddha Dharma Mandalam, Translated into English by Mr. R. Vasudeva Rao.
(2) **Heart of Doctorine of Bhagawad Gita and its Message** by Mr. R. Vasudeva Rao.

## JOURNALS

(*e*) (1) **The Indian Theosophist**—March 1940. By T. Society, Indian Section, Benares.
(2) **Kalyana Kalpataru**—March 1940 Gorakhapur.
(3) **Vision**—March 1940 By Anandashram, Kanhangad S.I.R

(4) **Divine Life Journal**—All issues from Dec. '39 upto now by
Divine Life Secretary, Rishikesh,
Dehra Dun Dt.

(*f*) **Meherbaba Journal**—All issues from Nov. '39 upto date
Palace Road, Banglore.

(*g*) **Kashmir Times**—All issues of March '40 Shrinagar, Kashmir.

(*h*) **Sunday Times**—All issues upto date—Madras.

(*i*) From Mr. M. R. Sampatkumaran M. A., Triplicane.

(1) **Lectures on Bhagavad Gita**—by Prof. Rangacharya,
Vol. II & III

(2) ,, ,, ,, ,,

(3) **Translation of Sri Vachana Bhushana**–by Parthasaradi Iyengar.

(4) **Lectures on Doctorine of Visishta Adwaita**—by ,, ,,

(*j*) From Sri Venkateswara Sastrulu, Prop. Vavilla Press, Madras
Five volumes intended for Parayana (Pothi)

(1) **Valmiki Ramayana** Balakanda & Yuddhakanda.

(2) **Srimad Bhagavata** in 2 volumes

(3) **Sri Ramkarnamrita**

(4) **Sri Kristna Karnamrita**

\+ + + +

## NOTE

Devotees and Correspondents will kindly note that Sai Baba and this journal (Sai Leela) have no sides to take in politics. All parties receive blessings and can trace Baba's hand in the blessings they receive in their politics; and they may, if they choose, communicate the same to the public through this S. L. M. One request, the Editor makes, is that all correspondents should avoid the need-ess introduction of any matter or language that may give offence to readers of this S. L. M.

**Editor.**

163

# EXPERIENCES.

★
★★

Extract of the letter dated 2-4-40 received by Mr. A. S. Gopalakrishnan, Trichinopoly, from Mr. K. Gopalakrishnan, B. A., Deputy Superientendent of Police, Cuddalore.

I have a friend in Cuddalore. His wife was recently delivered. A few days after the birth of the child she became benumbed and practically unconscious. She lost all senses and was simply sleeping or take it as what you will. She did not suckle the baby, and my poor friend had her treated by all the doctors, with no effect. He met me accidentally and from his face I could see the misery in him, I immediately thought of Sri Sai Baba and His Vibhuti. I gave him one of the pictures I had with me and also the Vibhuti. He put a little of the Vibhuti into her mouth and pasted it on her face Within a minute or two the woman started to moan with pain, though she was merely living without any sense before. And my friend had this picture framed and hung it over her bed. The next day she started suckling her child, and she is now alright.

They have named the child Venkata Sainath Sarma.

# RAO BAHADUR M. W. PRADHAN

Advocate ( O. S. ) High Court, Bombay & Ex. M. L. C,

———:o:———

I have had the proud privilege of narrating numerous experiences ( Lilas ) of Shree Sai Baba. I propose to mention one of the latest.

In the last Municipal Elections of the Bandra Municipality held on the 20th November 1938 I stood as a candidate from the "I" ward ( Santa Cruz area ). The Congress party was out to capture all the seats in the said Ward and was determined to unseat me. Brisk canvassing had already begun since July 1938. There being a distinct majority of Christian voters in this Ward the Congress party put up a Christian candidate. The symbol selected for this candidate was a Cross, the idea being to carry away the voters on religious sentiments. For the other seats they put up Mr. Jaisukhlal K. Mehta M. A. Secretary of the Indian Merchants Chamber at Bombay and Mr. Pandurang Vithal Patil, a pleader of 36 years standing in the Thana and Kolaba Districts. All electioneering tactics were availed of but by the grace of Sai Baba my opponents did not succeed against me. In July and August I did what little work I could in the matter of my election. From September my health began to fail so much so that I was confined to bed practically the whole of October, November and the middle of December 1938. It was Baba's Lila that took me on the 16th November, for about half an hour for getting fixed the site of my election booth and on the 20th November the voting day, I attended my polling booth from 8 A.M. to 12 noon and 1 P. M. to 6 P. M. as if nothing was ever wrong with me. Voluntary workers like Waman A. Kirtikar Esq. Bar-at-Law; Mr. Bholanath Sunderrao Navalkar M. Sc.; Mr. Vishwasrao Ganpat raoKothare; Dr. K. R. Thakkar, Mr. Azavedeo; Messrs. Fernandez Bros. with a batch of stalwart Christian youths including my canvassing enthusiasts Messrs. Dadus and Basil, Leaders of Bhayyas like Lalloo Sing Ramdhari Sing and Shambihari Sing; leaders of Marathas

like Sakharam Rama Patil, Laxman Mahadeo Neman and Adishe and some wellknown Mahomedans like Bal Amir did their best in getting me elected. The enthusiasm of my workers coupled with the grace of Sai Baba wrought wonders in my election.

An incident which can be explained only as Baba's Leela needs to be mentioned here. A motor bus which was bringing in my voters was stopped by the Congress volunteers on the ground that the bus was plying for hire. The D. S. P. was approached and on the arrival of the Sergeant on the spot, a copy of the letter addressed to the D. S. P. by the owner of the Bus Co. was shown to him and the obstructionists were warned by the police. The mischief was meant to stop the inflow of my voters. Irrespective of the loss of time Baba saw and took care to see that I succeeded in my election. A Mahar voter of mine was severely assaulted by the Congress volunteers with the result that my volunteers got enraged but I requested them to keep cool for I had implicit faith in Sai Baba that nothing was going to impede my success.

The results of the election were as under:—

1. Rao Bahadur M. W. Pradhan...897 Votes...Independent.
2. Mr. J. K. Mehta....................606 Votes...Congress.
3. „ A. B. D' Souza..............397 Votes...Congress.
4. „ P. V. Patil....................389 Votes...Congress.

The above results enraged the Congress party with the result that a false and bogus election petition was filed against me in the Thana Court. On the day i. e. 23/12/38 I was elected Vice President of the Bandra Municipality and I wanted to go to Shirdi with Mr. Vasantrao N. Gorakshakar the Summons was served upon me. Taking the same with me to Shirdi I placed it on the Holy feet of Baba and Baba tore it into pieces exposing the Congress party in its true colours as the judgment in the said case will show. Thanks to Mr. Ramdutt Vithoba Desai and his son Mr. Jayant who appeared for me in the Thana Court.

On the 23rd October 1939 I started for Shirdi with four new comers viz: 1) Sakharam Rama Patil alias Buva; 2) Laxman Mahadeo Neman 3) Dr. Kundan R. Thakkar and Miss K. Murzelle (alias Katibai) a duly qualified nurse. Miss Katibai had been silently worshipping Sai Baba before she went to Shirdi and Baba had on many occasions responded to her prayers. A fortnight before she left for Shirdi she was called upon to attend to a serious case of labour. She prayed before the photo of Baba and went off on her errand. Finding that it was a difficult case she sent for some drugs and instruments. Katibai brougnt Baba's Udhi into use and with a heart full of prayers she succeeded in her endeavours.

On the 14th October 1939 the half yearly report of the Sai Baba Charitable Dispensary was publicly announced and in the unavoidable absence of Dr. Mrs. Malinibai Sukhtankar I, as the President of the Executive Committee of the said Sai Baba Dispensary made an appeal to the public to help the institution which was in immediate need of financial help because of the fabulous rise in the prices of drugs. Miraculously enough the very next day a devout Bhakta of Sai Baba saw me and without my opening my lips gave such generous donation to the Dispensary as has releived it from immedite financial anxiety. It may be mentioned here that Mr. Vasantrao N. Gorakshaker who is one of the newly elected Trustees of the Sai Baba Shirdi Sansthan and who is also a member of the Executive Committee of the said Dispensary, has been from it's very inception giving his mite to the Dispensary every month. On the day of the reading of the half yearly report he distributed Sai Baba's photos to the Medical Staff of the Dispensary free. Owing to the indefatigable efforts of Dr. K. R. Thakkar and Miss Katibai the Sai Baba's Sarvajanik Charitable Dispensary is what it is to-day viz: promising. It must be mentioned here that Baba's Udhi plays an all important part in the treatment given to the patients taking advantage of this Dispensary and it is a matter of great pride that there has so far

On the 22nd October 1939 Miss Katibai was informed by me about our going to Shirdi. She ran up to the Lady Doctor in-Charge to ask for two days leave. The leave was refused. She was determined to accompany us by 10-30 p. m. train even at the cost of her service. She again approached the said Lady Doctor and with great unwillingness leave was granted. Having no time to go to her place for food Katibai came to the Station without food or water. When offered she said she would take it after taking darshan of Shree Sai. While at Shirdi Katibai was anxious to know whether Baba accepted her devotion and Baba appeared to her in dream and told her to offer him Shevanti Chaddar. Her leave was to expire on Monday and she was expected to resume duty on Tuesday night. We reached Bombay on Wednesday and Katibai decided to take rest and go to the Hospital the next day to see if she was wanted. On the very day she received a call from the Hospital asking her to attend which she did without any word of reburke from the Lady Doctor in charge. Three or four days thereafter the said Lady Doctor received an urgent call from the Morvi State. Of all the nurses Katibai was chosen to assist the said Lady Doctor and thus she flew to Morvi State in a plane. Before leaving she prayed to Baba for safe journey and success in the undertaking and Baba, ever merciful as he is, granted both her requests.

# List of books about Shri Sai Baba.

—:o:—

Madras books available at Sai Samsthan, Shirdi, Rahata P. O. and with:—

Rao Saheb B. Papaiya Chetty, 55, Stroten Muthia Mudali Street, Madras.

| | | |
|---|---|---|
| Introduction to Shri Sai Baba by B. V. N. Swami | | |
| English, Malayalam, Tamil, Telugu, Canarese & Urdu | | 0-2-0 |
| Experiences of Devotees of Shri Sai Baba by B. V. N. Swami (English) part 1 | ... | 0-4-0 |
| " " " " 2 | ... | 0-4-0 |
| " " (in Tamil) Part 1 | ... | 0-4-0 |
| Madras Devotee's Experiences (English) ... | ... | 0-4-0 |
| The above three English books bound in half calico | ... | 0-12-0 |
| " " " in wrapper | ... | 0-10-0 |
| Namawali (i. e. 108 names of Sai Baba) In Sanskrit, Telugu, Tamil, Malayalam, Canarese. each ... | ... | 0-0-6 |
| Sai Leela (in Telugu) by Rao Saheb B. Papaiya Chettiar. | | 0-8-0 |
| Sai Stava (,,) by Satavadani Doma Venkatswamy Gupta. | | 0-2-0 |
| Sai Sadgeeta (Tamil) songs set to music by Sow. S. Rajam | | 0-1-0 |
| Sai Sangita Kirtan (,,) by Sow Amritam ... | ... | 0-1-0 |
| Sai Pooja Vidhi in Tamil for Sanskrrt ... | ... | 0-1-0 |
| Sai Manasa Pooja (Sanskrit) ... ... | ... | 0-1-0 |

Gujrathi:—

" Guru Smriti, " " Manache Shloka " & " Hari Path " write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira.

For Old issues

of Sai Leela, the Satcharit by Dabholkar, (Marathi verse) Rs. 3-8 Kekavali with Yeshoda Pandurang notes. (Marathi), Rs. 2, Rao Bahadur M. W. Pradhan's book "Sai Baba of Shirdi" (English), Re. 1/- Kirtan, Datta, Nanasaheb Chandorkar, Punyatithi, Akhyans, all in Marathi, by Mr. B. V. Deo, B. A., Independent issues of Sai Leela containing lives of Dikshit, Mhalasapati, Chandorkar, the Dwarkeswami Sanshodhan, Sagunopasona, (Marathi Bhajanavali), write to Mr. R. R. Samant, Hony. Treasurer, 45, Turner Road, Bandra, Bombay, 20.

or Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle and to Rao Saheb B. P. Chetty, 55 Strothen Muthi Mudali Street, Madras.

# अनुभव

गुरुवार ता. ५ नवेंबर १९३१ रोजीं सकाळीं सुमारें ७-३० वाजतां एक महापुरुष एकाएकीं घरीं आले. त्यांचें येणें आज तीन चार वर्षांनीं झालें. त्यांनीं आग्रहपूर्वक विनंति केली कीं पंढरीस जाऊन यावें. दिवाळीच्या सणानिमित्तानें आगगाडीच्या खास सवलती झाल्या आहेत. शनिवारीं रात्रीं मद्रास मेलनें निघावें. रविवारीं सकाळीं ८-३० वाजतां पंढरी पंढरीस नुसती नजर फेंकावी. इकडे तिकडे पाहावें, आणखीं कांहीं करणें नलगे. संध्याकाळीं साडेपांच वाजतां पंढरीहून निघावें आणि मद्रास मेल पकडून सोमवारीं सकाळीं मुंबई.

मन लालचावलें. परंतु पुन्हां मनांत विचार आला कीं दोन रात्रींचें जागरण, आणि दर्शनाची वगैरे रेंटारेंट, आपला वृद्धापकाळ, शिवाय श्री-पांडुरंगरायाबरोबर आपलें कितीएक वर्षांचें एक प्रकारचें भांडणच कीं "तूं जवळ न घेतां पुन: पुन: संसारांत परत पाठवितोस त्या तुला काय म्हणावें?"

पुन्हां वाटलें कीं श्रीदासगणूंनीं वर्णन केलेल्या आपल्या महाराष्ट्रीय संतांच्या युनिव्हर्सिटीचे श्रीविठ्ठलराय हे महा चान्सेलर, त्यांचीं चित्रें पहावीं तर तीं अगदीं अनाकर्षणीय, तेव्हां हें गौडबंगाल आहे तरी काय तें प्रत्यक्ष पहावें. !

एक मुलगा वारकरी आहे त्याची कुटुंबासहित दरवर्षाची पंढरीची वारी असते, त्याला माझ्याबरोबर जाण्याचें सुचविलें. त्याप्रमाणें शनिवारीं रात्रीं निघावयाचें ठरविलें, आणि बोरीबंदरवर जाऊन दोन टिकिटें काढून जागा रिझर्व्ह केल्या. संध्याकाळीं घरीं आलों, तों पर्यंत ते सत्पुरुष घरींच होते. त्यांनीं आनंद प्रदर्शित केला व तावडतोब वऱ्हाडांत जाण्यासाठीं निघून गेले.

शनिवार ता. ७ रोजीं रात्रीं मद्रास मेलनें निघून रविवारीं सकाळीं ९-३० वाजतां कुर्डुवाडीस पोंहचलों. तेथे बार्सी लाइट रेल्वेचे ट्रॅफिक

सुपरिन्टेन्डेन्ट रा. रा. आजरेकर मित्रमंडळीसहित भेटले. श्री. आजरेकर-साहेब आणि त्यांचे बंधु बेळगांवचे वकील श्री केशवराव आजरेकर हे श्रीसाईबाबांच्या बालगोपालांपैकीं अत्यंत आस्थवाईक सद्गृहस्थ आहेत.

श्री आजरेकरांनीं व त्यांच्या मित्रमंडळींनी कुर्डुवाडीस रेल्वे कंपाउन्डमध्यें सरकारकडून जमीन मिळवून अत्यंत रमणीय असें एक श्रीराम मंदीर बांधलें आहे. सायंकाळीं श्रीरामचंद्राचें दर्शन घ्यावयाचें कबूल करून ६—३० वाजतां कुर्डुवाडी सोडून ८--३० वाजतां पंढरीस गेलों. पुलावरून श्रीचंद्रभागेचा देखावा सकाळच्या प्रहरीं रमणीय व आल्हादकारक वाटला.

श्रीगोधडेबुवांच्या धर्मशाळेंत उतारा केला. मुलगा येथेंच उतरत असतो. ही टोलेजंग इमारत स्टेशननजिक पंढरपूरच्या रस्त्यावर अति सुंदर स्वच्छ व हवाशीर ठिकाणीं बांधलेली आहे.

या इमारतीपुढें एखादा राजवाडा तुलनेस अपुरा पडेल. यांत यत्किंचित अतिशयोक्ति नाहीं. मुख्य दरवाजानें आंत शिरल्यावर एक सुंदर चौक लागतो. या चौकाच्या चारही बाजूंला दोन मजल्याच्या सुंदर इमारती आहेत, त्यांच्या पुढच्या व कित्येकांच्या मागल्या बाजूस खुले सज्जे आहेत. जेणेंकरून वारा कोणत्याही दिशेचा असला तरी तो या इमारतींत हमेशा सारखा खेळत राहतो. प्रत्येक दालनाच्या खोल्या विस्तीर्ण आहेत आणि त्यांची जमीन उत्तम तऱ्हेनें घोटलेली आहे, जेणेंकरून ती तावडतोब धूवून स्वच्छ करितां येते. या इमारतीशिवाय आणखी दोन चौक चारही बाजूंनीं बांधलेल्या दालनांसहित आहेत. स्वयंपाकाकरितां भांडीं मिळतात जीं धर्मशाळा सोडण्यापूर्वी परत सुप्रत करावयाचीं असतात. धर्मशाळेची कामदार मंडळी आपआपल्या कामांत अत्यंत दक्ष व निष्ठायुक्त अशी आढळली.

स्नानें करून श्रीपांडुरंगाच्या दर्शनासाठीं निघालों. दिपवाळीसाठीं यात्रेकरूंची रग नुकतीच सुरू झाली होती. महाद्वारांतून शिरल्यावर आजूबाजूची बांधणी कोणत्या थाटाची आहे, बुद्धधर्मीय काळाची आहे किंवा कशी याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. तरी पण देवालयाची आकर्षणीय बांधणी पाहात पहिल्या सभामंडपांतून श्रीनामदेवाची पायरी ओलांडून आंत गेलों.

वर वर्णन केलेल्या श्री विठ्ठलरूपी चान्सेलरसाहेबांच्या समीप जातांच आश्चर्य वाटलें. चान्सेलर साहेबांच्या रूपांत काय मोहकता आहे तें सांगवत नाहीं, लिहितां येत नाहीं. श्री ज्ञानदेवादि संतांपासून आजतागायत सर्व संतांना वेड लावणारी अशी ही मूर्ती आहे खास. आनंदाचें भरतें येऊन देवाच्या पायावर मस्तक ठेवलें. बायकोच्या अनुभवाची आठवण आली. अत्यंत विस्मय वाटला. श्रीच्या बडव्या गडयानें श्रीचा हार गळयांत घातला. अतिप्रसंग होतो असें वाटलें. गळयांतून हार काढूं लागलों. बडवे गृहस्थ म्हणाले, " असोंद्या, इकडचा रिवाज असा आहे कीं, देवळांत गळयांतला देवाचा हार काढूं नये. देवळाबाहेर गेल्यावर काढावा. " कसेंसेंच वाटलें. देवा माझी योग्यता ती काय ? केवळ अनधिकारी यःकश्चित् मनुष्य, नाहीं कसचें अध्ययन, नाहीं कसचें साधन ! चित्रांत तूं कसा विद्रूप दिसतोस, आणि येथें तुझें कसें प्रेमपूर्वक अवलोकन ! आहे तरी काय ! अथवा, हे माझ्या सद्गुरु माउलीचेच खेळ कीं त्यामुळें तुझें असें मोहक रूप मला माझ्या चर्मचक्षूंनीं दिसावें ?

" रूप पाहतां लोचनीं, " " काय मौजेचा पंढरीनाथ, " "सुंदर तें ध्यान " वगैरे वगैरे तुझी वर्णनें विद्युत् वेगानें डोक्यांत आलीं ! आपल्यामुळें भाविक मंडळींचा खोळंबा होत असेल म्हणून पुन्हा एकदां मस्तक पायांवर ठेवून देवाकडे दृष्टि फेंकून, त्याची रजा घेऊन जड अंतःकरणानें देवळाबाहेर पडलों.

बाहेर येतों तों मुलानें कान्होपात्रेचें झाड दाखविलें. त्याला नमस्कार करून श्रीरुक्मिणीच्या देवळांत गेलों. माता आनंदांत दिसली तिच्या

भालप्रदेशीं कुंकुमाचा टिळा लावून व पुन्हा श्रीफळ व गळ्यांतल्या हाराचा प्रसाद मिळवून आनंदानें मंदिराबाहेर पडलों आणि बिऱ्हाडाकडे वळलों. ( या प्रसंगावरून अशाच एका अनुभवाची श्रीरामेश्वराच्या सन १९१० च्या यात्रेंत घडलेल्या प्रकाराची आठवण झाली जी पुढेंमागें श्रीलीलेच्या एखाद्या अंकांत कदाचित् येईल. )

असो ! वेळ मध्यान्हीची होती. यावेळीं श्री गोधडेबुवांच्या धर्मशाळेंतून त्याच्यालागतच्या खुल्या आवारांत, गांवातल्या सर्व आंधळ्या लंगड्या, लुल्या आणि व्याधिग्रस्त अशा सर्व अपंग व अनाथ लोकांस ताजें शिजविलेलें अन्न पुरविण्यांत येतें. एक दिवस भात आणि आमटी, दुसऱ्या दिवशीं भाकरी असें आळीपाळीनें देण्यांत येतें. त्या दिवशीं भात आणि आमटी वाढण्यांत आली. अन्न उत्तम प्रकारचें होतें.

तें अन्न वाढण्यापूर्वीं दहा-पांच मिनिटें "रघुपतिराघव राजाराम पतीतपावन सीताराम" या महामंत्राचा जप ते दीनदुबळे लोक मोठ्या उत्साहानें व आनंदानें करतात.

हें दृश्य पाहून मनस्वी आल्हाद झाला, आणि श्री गोधडेबुवांच्या एकंदर सर्व चमत्कृतीचें आश्चर्य वाटलें.

या सर्व इमारती बांधतांना वर्गणी देणारांचीं नांवे आणि त्यांच्या देणग्या मोठमोठ्या तक्त्यांवर नोंदलेलीं आहेत, त्यांचा तपशील पाहतां किती तरी अनेकपटीनें खर्च झाला आहे, आणि बिनबोभाट चालत आहे. अत्यंत गरीबांच्या ठिकाणीं निस्सीम प्रेम, आस्था, तसेंच त्यांच्या सद्गतिसाठीं उत्कंठा; इतर साधारण मनुष्यांसाठीं सर्व प्रकारची सोई जी कदाचित् त्यांच्या स्वत:च्या राहत्या घरीं मिळत असेल याची वानवा; आणि हें सर्व एखाद्या सुयंत्राप्रमाणें अहर्निश चालावें अशी योजना, हें कांहीं लहानसहान काम नाहीं. माझ्यासारख्या पामराच्या अकलेबाहेरची ही गोष्ट आहे. माझी मति गुंग झाली.

श्रीशिरडीच्या जाडया जाडया व्यवस्थापकांनीं एकदां तरी श्रीपंढरीस जाऊन लहान थोरांसाठीं ही केलेली व्यवस्था अवश्य पहावी अशी त्यांस नम्र विनंति आहे.

या धर्मशाळेप्रमाणें श्रीगोधडेबुवानीं महार आणि परीटांसाठीं दोन निरनिराळ्या पण विस्तीर्ण अशा बैठ्या बांधणीच्या धर्मशाळा बांधल्या आहेत, त्या पण पाहिल्या. त्यांची टापटीप, स्वच्छता वगैरे सर्व व्यवस्था पाहून अत्यंत आश्चर्य चकित झालों.
श्रीतुकोबारायांच्या अभंगाची आठवण झाली.

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ।
दया करि जे पुत्रासीं । तेचि दासां आणि दासीं ।
तुका म्हणें सांगों किती । तेचि भगवंताची मूर्ति ॥ १ ॥

तेथून पंढरीचें अनाथ आश्रम पाहिलें. ज्याविषयीं पुढील एखाद्या अंकांत लेख येईल.

नंतर श्री दासगणूंच्या मठीकडे गेलों, व त्यांची भेट घेतली. त्यांनीं अत्यंत प्रेमानें आदरातिथ्य केलें. त्यांच्या मठींत श्री साईबाबांचा एक पूर्वकालिन् मनोवेधक चेहरा आहे. त्याची तशीच दुसरी प्रत कै. नानासाहेब चांदोरकरांच्या घरीं आहे.

श्री दासगणुंचा निरोप घेऊन श्री गोपाळपुऱ्यास गेलों. तिकडच्या देवालयांच्या एकंदर भक्कम बांधणीवरून कदाचित् या देवालयावर अनागोंदीच्या राजानें हल्ला करून त्याच्या मधल्या श्रीविठ्ठलाला त्यानें तिकडून पळवलें असावें असें वाटलें. या विषयीं पुरातन वस्तुसंशोधनवेत्ते विशेष विस्तृत व साधार माहिती देऊं शकतील.

तेथें जनाबाईचें भुयार दाखवितात. त्यांत श्री विठ्ठल व जनाबाईच्या मूर्ती आहेत. कांहीं जुने कपडे आहेत, त्यांना जनाबाईची गोधडी

११७

म्हणतात. हे कपडे अलिकडचे दिसतात. शिवाय त्यावेळेचे कपडे इतकी वर्षे अशा उघड्या हवेवर टिकणें अशक्य कोटींतलें आहे. जनाबाई बापडी, देवाची लाडकी जनी, जिनें देवाला " देव भावाचा लंपट " अशा सलगीनें संबोधावें, तिला अशा भव्य ठिकाणीं राहावयास ठिकाण मिळावें हें अशक्य ! ती बापडी गरीब नामदेव शिंप्याच्या आंगणांत त्याची बटीक म्हणून एका कोपऱ्यांतल्या झोंपडींत राहत होती, हें सर्वांना ठाऊक आहे.

कदाचित् या भुयारांतून त्या धामधुमीच्या काळीं किल्ल्याबाहेर पडण्यासाठीं अथवा किल्ल्यांतल्या भांडाराकडे अथवा कोठी वगैरे धान्यागाराच्या संग्रहस्थानाकडे जाण्याचा मा ' असावा जो मागाहून लिंपण्यांत आला असावा.

या गोपाळपुऱ्याच्या भव्य इमारतीविषयीं इतिहास व पुरातन वस्तु संशोधक गृहस्थांनीं, साधारपूर्वक माहिती जरूर पुरवावी.

स्थान अत्यंत रमणीय आहे. यात्रेकरूंनीं तें अवश्य पाहावें. या शिवाय श्री पंढरींत अनेक प्रेक्षणीय स्थळें असलीं पाहिजेत. जीं पुढेंमागें पाहाण्याचा प्रसंग आल्यास त्यांविषयीं आनंदानें उल्लेख होईल.

इतकें विस्तारानें लिहिण्याचें मुख्य प्रयोजन हेंच कीं श्रीविठ्ठलराय आमच्या महाराष्ट्रीय संतांच्या युनिव्हर्सिटीचे मुख्य चान्सेलर आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे, आणि त्यांचें प्रत्यक्ष दर्शन झाल्याखेरीज श्रीनामदेव तुकारामादि संतांच्या श्रीविठ्ठलासंबंधींच्या बहुतेक प्रेमळ काव्यांच्या गर्भींतार्थाचा उलगडा कालत्रयीं व्हावयाचा नाहीं.

या सर्व आत्मसाक्षात्कारी संतांनीं आपल्या अप्रतिम प्रेमयुक्त **विचारांनीं** या मूर्तींत अशी कांहीं स्फुर्ति म्हणा, जादु म्हणा, काय वाटेल तें म्हणा, अवर्णनीय शक्ति ओतप्रोत भरली आहे कीं, तिचा स्वल्पसा अनुभव घेऊन श्रीसद्गुरुसाई माऊलीच्या आश्वासनाची आठवण होऊन वारकरी पंथाचें खरें रहस्य दृष्टोत्पत्तीस आलें.

प्रतिवर्षी एकदां किंवा दोनदां वारी करण्याचा उघड हेतु हाच दिसतो कीं या मूर्तिच्या अवलोकनानें ती मनांत भरावी, ठसावी, रात्रंदिवस तिचा निदिध्यास, संतांच्या गुणवर्णनपर कवनानीं लागावा. आमच्यासारख्या केवळ अनभिज्ञ अशा मजूर लोकांस ती मूर्ति रात्रंदिवस कामकाज करतानां अंतःचक्षूंपुढें दिसावी; आणि संसाराची सर्व प्रकारची भिस्त तिच्या ठायीं ठेवण्याची निष्ठा उत्पन्न व्हावी. दर वर्षांची वारी करून हें करण्याचें स्वाभाविक रीतीनें मनांत ठसत जावें, आणि त्यामुळें तन्मयता व त्यापुढली स्थिति आत्मसाक्षात्कार, हीं प्राप्त व्हावी, मग त्या मनुष्याला आणखी मिळवावयाचें तें काय राहिलें ? देवाला हृदयांत पक्का कोंडून ठेवणाऱ्या मनुष्याला आंत बाहेर सर्व ठिकाणीं सर्वांमध्यें आत्मस्वरूप दृग्गोचर व्हावयाचेंच. त्यानंतर त्याच्या स्वेच्छेप्रमाणें जनसमुदायासाठीं योजिलेल्या गोष्टी, सर्वशक्तिमान, अंतर्बाह्य सर्वव्यापी हृदयस्थ प्रभूस फलद्रूप करण्यास गरज पडतेच पडतें हें आपण पाहत आहोंत.

असो ! ओघानें लेखणी वाहवत चालली तिला आळा घालून आणि सूज्ञ वाचकांची या अतिप्रसंगामुळें क्षमा मागून पुढील हकीकत सांगतों.

त्या दिवशीं संध्याकाळीं ५--३० वाजतां पंढरपूर सोडून ७--३० वाजतां कुर्डुवाडीस आलों, आणि श्रीआजरेकरांच्या मित्रमंडळीसोबत श्रीराममंदीर पाहावयास गलों.

मंदीर साधें पण सुबक बांधलेलें आहे. श्रीरामचंद्र, सीतामाउली, आणि श्रीलक्ष्मण यांच्या मूर्ती अलिकडील घडणीच्या सुंदर व मोहक आहेत. विस्तीर्ण सभामंडपाच्या सन्मुख श्रीबलभीम अखंड सेवेंत हजर आहेत.

हें स्थळ व आजूबाजूचा बगीचा पाहून मनास समाधान वाटलें. ही सर्व मंडळी विद्वान व आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रविण ( Scientific ) कामकरू व होतकरू, तसेंच निरनिराळ्या प्रांतांतली, निरनिराळी भाषा

170

बोलणारी अशी पांच ठिकाणची असून आचारविचारांनीं अत्यंत थोर मनाची आहे.

पाश्चात्य संस्कृतीचा छाप असूनही याप्रमाणें साधारण जनसमुदायाला भक्तिमार्गाला लावण्याची वर लिहिल्याप्रमाणें आपली प्रेक्षणीय पद्धत टाकून न देतां तिचें संगोपन या प्रमाणें करून, श्रीपंढरीरायाच्या दर्शनाला जाणाऱ्या मार्गाच्या ऐन कोनावर हें सुंदर मंदीर बांधून देवाच्या पूजेअर्चेची सुव्यवस्था लावून, भक्तिमार्गाची ही भक्कम मेढ त्यांनीं रोंविली आहे. हें देवालय पंढरीस जाणाऱ्या यात्रेकरूनीं जरूर पहावें अशी त्यांना नम्र विनंति लेखक करीत आहे.

श्रीसाईमाउलीचे बालगोपाल कसकसे व कोठें कोठें आपल्या गुरुमाउलीचा बोध मनांत खास ठसावून जनतेला पाश्चात्य शिकवणीच्या निराशारूपी अनैश्वर्यवादी भावनांच्या भयंकर खोल भोवऱ्यांतून सुखरूप बाहेर काढून संतांच्या शिकवणींकडे लक्ष देऊन तिच्यांत सन्मार्गाकडे लावण्याची स्फुर्ति कशी उत्पन्न करवीत आहेत याचें हें प्रत्यक्ष दृश्य पाहून हृदय भरून आलें.

या सर्व गोड ंडळीचा व प्रेमळ स्टेशन मास्तरांचा निरोप घेऊन सोमवारीं सकाळीं मुंबईस आलों. यत्किंचितही त्रास झाला नाहीं.

बलिप्रतिपदा,<br>शके १८५३.

"म्हातारा"

# अनुभव

श्रीसाईनाथ महाराज की जय ! श्रीसद्गुरु प्रसन्न ! श्रीसमर्थांच्या कृपेनें माझा जन्म चांगल्या कुळांत झाला; आणि त्यांच्याच कृपेनें एका गरीब पण सच्छील कुटुंबांत माझा संबंध जडला. माझी लहानपणापासून ईश्वरावर भक्ति, तेव्हां थोडयाच दिवसांनीं मला हे सद्गुरूचे पाय दिसले. तेव्हांपासून माझा भार माझ्या ह्या अत्यंत कनवाळु कृपाळू साईबापावर आहे. माझ्या गेल्या जन्माच्या संचित कर्मानें, मला ज्या कांहीं वाईट गोष्टी गेल्या त्याबद्दल माझे बाबा काय करणार ? मी वाईट कर्म करून बाबांना संकटांत कशाला ठेवावें ? परंतु ही माझी सद्गुरुनाथ माऊली नेहेमी माझ्यावर कृपेची साउली करीत असते. मला या संसारसागरांतल्या लाटांनीं अगदीं हैराण केलें आहे, परंतु माझ्या माऊलीनें त्या लाटा तोडून टाकण्याचा नियम केला आहे. हरएक शब्दानें मनाला आनंद न होतां त्रासानें जीवाचा कंटाळा येतो, परंतु समर्थांच्या नावानें मनाला एक-प्रकारचा अल्हाद होतो व संकट निरसन होतें. असे हे महासाधु ईश्वर लीलाधारी, भक्तासाठीं अवतारी, त्यांच्या चरणांची नेहमी भक्तांनीं आठवण करून स्मरणजागृति ठेवावी.

ह्या भक्तिरूपी दात्यानें आपल्या भक्तांचें संकटांत कसें रक्षण केलें आहे ते पहा. पुढील अनुभव माझ्या परिचयांतलेच असल्यामुळें ते येथें देत आहें:—

१ एका भक्तिवान बाईवर असा प्रसंग आला कीं, तिच्या पतीची वेळ-घटका भरली, तेव्हां त्या बाईनें बाबांची प्रार्थना केली कीं, तुझ्या दर्शनासाठीं मी पायीं येईन, पतीला बरें कर. त्याप्रमाणें तिचा पती बरा होऊन तो दुखण्यांतून उठला. तेव्हां ती साधुदर्शनासाठीं निघाली. तेव्हां बाबांनीं स्वप्नांत दर्शन देऊन दृष्टांत दिला कीं, श्रीगंगेचे (गोदावरीचे) ...टीं मंदिराचे कळसांत बाबा बसले आहेत आणि तिला " बाई ! तुझा

नवस मला पोंचला. तूं कष्टी होऊं नकोस, आणि पायीं मार्ग क्रमूं नकोस " असें ते करुणापूर्वक शब्दांनीं बोलले.

या गोष्टीला १५।१६ वर्षें झालीं. श्रीगुरुपूर्णिमेची वेळ होती. रस्त्यांत इतरांना हरएक संकटें आलीं, गाडीचीं चाकें मोडलीं, कोणी पडले, कोणास ताप, कोणास वाखा, कोणाचे हातपाय सुजले आणि कोणी आगगाडीखालीं देखील आले. अशा सर्व संकटांतून श्रीसाईबाबांनीं त्या बाईवर रक्षणाचें सुदर्शन ठेविलें होतें.

त्या नंतर दरसालीं दरमहिन्याला त्या गरीब बाईवर नाना तऱ्हेचे प्रसंग येत असत, त्यांतून तिला हे कनवाळु बाबा पार पाडीत असत. बाबा, माझे ताता, 'देहातें होते तोंपर्यंत ज्या भक्तानें धांवा केला त्या त्या भक्ताकडे धांव घेत असत.'

२ एक वयातीत बाई फार सीक होती. डॉक्टरांचा उपाय हटला, तेव्हां बाबांच्या जवळ एका भक्तानें चरणतीर्थ मागून घेतलें, व तें तीर्थ आणून त्या बाईस प्राशन करण्यास दिलें. दुसऱ्या दिवसापासून त्या वयातीत बाईस गुण आला. जवळ असणाऱ्या बाईस बाबांनीं तिथें जाऊन आपलें स्वरूप दाखवून सीक असणाऱ्या बाईस उपचार करीत आहे असें दर्शविलें.

३ तसेंच एका बाईस बाबांनीं स्वप्नांत जाऊन दक्षणा मागून तिला मंत्रोपदेश सांगितला.

४ एका भक्ताच्या घरीं हरिकीर्तन करीत आहेत असें दर्शविलें.

५ एका वेळीं असें घडून आलें कीं, एक बाई आपल्या लहान लहान मुलांबाळांना घेऊन व जवळ ५—६ हजारांचा माल घेऊन नोकर ( हमाल ) घेऊन आगगाडींतून जाण्यास निघाली. मुंबईतल्या लबाड

१ देह सोडल्याला आज लगबग १३ वर्षें झालीं तरी श्री साईमाऊली हीच प्रचीति सध्यां देखील दाखवीत आहे.—संपादक.

लोकांची गर्दी. त्यांत तिच्यावर कसा प्रसंग गुदरला तो पहा ! ती बाई बाहेरगांवच्या आपल्या नातेवाइकांकडे जाण्यास निघाली. स्टेशनवर आली तेव्हां तिची कांहीं लहान मुलें आगगाडींत बसलीं. व हमालाच्या जवळ पांच-सहा हजारांचा माल घेऊन तो बसला. इतक्यांत गाडी चालू झाली. ही बाई स्टेशनवर ओरडत बसली व धैर्यानें गार्डाला म्हणाली माझीं मनुष्यें अमूक स्टेशनवर उतरवा. त्या बाईनें आपल्या सद्गुरूचें स्मरण करून धांवा केला. " बाबा ! या संकटांतून कोण काढणार ? माझीं दोन लहान मुलें कोठें जातील व कोण त्यांना उतरवील ? मी हा माल दुसऱ्याचा आणला तेव्हां तो हमाल कोठें जाईल व काय करील ? त्याचा नेम काय ? तिकीटा तर मजजवळ आहेत ! तेव्हां तूं समर्था, त्यांचेसाठीं धांवत जाऊन त्यांचें व माझें संरक्षण कर ! "

बाबा कनवाळु, कृपाळु, भक्तांचें संकट निरसन करण्यासाठीं, त्यांनीं आगगाडींत धांव घेतली. व ज्या डब्यांत तीं लेकरें बसलीं होतीं तेथील बसणाऱ्या बापानें त्या मुलांची चवकशी करून जेथें उतरण्याचीं होतीं तेथें उतरवून व जो हमाल माल घेऊन बसला होता त्याचे मनांत पूज्यभाव उत्पन्न करवून तोही तेथें उतरून त्या गोजिरवाण्या मुलांना घेऊन जेथें जावयाचें होतें तेथें गेला. ही बाई आपल्या बाबांवर पूर्ण भरंवसा ठेवून दुसऱ्या गाडीनें गेली. तेथें स्टेशनवर तिची मंडळी दिसली नाहीं. त्यांत ती जास्त घाबरून गेली. शेवटीं तिकीट घेणाऱ्या मनुष्याला विचारून खुणा घेऊन तेथें गेली. जेव्हां ती मंडळी तेथें सुखरूपपणें आहेत हें पाहून महाराजांना अतिशय विनवून आनंद पावली.

असे हे महाअवतारी साईनाथ, सहाय्य करणारे तात, ते ह्या दीन अबला मुलीवर नेहमीं दृष्टी ठेवोत असें अति करूण वाणीनें, पूज्य बुद्धीनें मी त्यांचेजवळ हेंच मागून माझा लेख पुरा करितें. सर्व भक्तांनीं ह्या साधुरूपी ईश्वराची जितकी भक्ति केली तितकी थोडीच आहे. भक्तांच्या पाप-

पुण्याईनें त्यांच्यावर संकटें तर येतात, परंतु आपण ह्या ईश्वराला उगाच दोष न द्यावा. जरी आपणापासून पैशानें मदत झाली नाहीं, व शरीरानें सुद्धां झाली नाहीं, तथापि भक्तिनें, मनानें करून त्यांना शरण रिघावें कीं, तेच आपणाला मदत करतील !

असो. हा लेख भक्तांच्या आग्रहानें मी वेडावांकडा लिहिला तो माझ्या भक्तबंधूनें सुधारून घ्यावा. आणखी वेळाअंतीं त्यांचे चमत्कार कळवून श्रीसाईं महाराज की जय म्हणून लेख पुरा करितें, त्यांचें विश्रांतिस्थान पाहाण्याची इच्छा करितें

आपली एक गरीब

**भगिनी.**

लेखिकेने लिहिलेला हा प्रेमळ लेख जशाच्या तसाच प्रसिद्ध करण्यांत येत आहे, त्यांत काडीइतकाही फेरफार करण्याचें धाडस होत नाहीं.

वांद्रें,
ता. २ दिसेंबर.

संपादक,
**रा. आ. तर्खड.**

# अनुभव

आज ता. ११ ऑक्टोबर १९३१ रोजीं एक सन्माननीय मित्र श्रीपुण्यतिथीची व त्रैमासिक वर्गणी भरण्यासाठीं घरीं आले होते, त्यांनी श्रीसाईमाउलीविषयीं स्वतःच्या अनुभवाची एक गोष्ट सांगितली. ती येणे-प्रमाणें:—

" मी सन १९१५ च्या गुरुपूर्णिमेस श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं प्रथम गेलों होतों. माझ्याबरोबर माझ्या परिचयाचे स्नेही होते."

" श्रींच्या पायां पडल्यानंतर त्यांच्या दरबारांत कठड्याबाहेर पड-वींत दूर बसलों. सर्व प्रकार पहात असतां मनांत विचार आला कीं, बाबा च्चिलीम ओढून आजूबाजूच्या मंडळीस ती ओढावयास देतात आणि मंडळी ती ओढते, तर आपणाला ती चिलीम ओढण्याचा सुयोग मिळेल काय !"

" हा विचार माझ्या मनांत येतांक्षणींच बाबा मला म्हणाले 'दूर कां बसावं ? असं जवळ येऊन बसावं !" हे शब्द ऐकतांक्षणींच अत्यंत आनंद झाला. वर जाऊन श्रींच्या पायांजवळ बसून 'त्यांची सेवा करूं लागलों. तेव्हां त्यांनीं चिलीम आपण स्वतः ओढून पुन्हा पुन्हा मला ओढ-ण्यास दिली. ही प्रचीति आल्यावर श्रींच्या पायीं श्रद्धा जडून घरी परत आल्यावर श्रींची तसबीर देव्हाऱ्यांत मांडून तिची पूजा अर्चा करूं लागलों."

" बाबासाहेब ! आपण जाणत आहांतच कीं मी एक मध्यम स्थितींतला गृहस्थ आहें. आपलं काम भलं की ऑफिसचं काम भलं ! नाहीं कुठं जाणं येणं किंवा कोणत्या संस्थेंत अथवा समाजांत सामील होणं ! तरी पण इतर मोठमोठे लोक करतात त्यांचं स्वाभाविक रीत्या अनुकरण करून माझे मित्र व मी संध्याकाळीं ब्रांडी सोडाच्या पेयाचें सेवन करीत असूं ; कधीं कधीं त्यांत अरस परस आग्रह होऊन त्याचा अतिरेक होऊन घरीं आल्यावर जेवण खाण काय आणि कसलें असें होऊन दुसऱ्या दिवशीं तबियत हटकून बिघडावयाचीच; असें असूनही

हा आमचा व्यास सुटला नाहींच. आमचीं शरीरें रोगी व ग्‍ण होऊं लागलीं पण त्याची दरकार कोठें ! !"

"मला पक्कें स्मरतें कीं इ. स. १९१७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या तारखेला पहांटेस मला स्वप्न पडलें कीं, साईबाबा मोठें थोरलें रूप धारण करून माझ्या छातीवर बसले आणि म्हणाले "पोरा ! हें तूं काय मांडलें आहेस ? पहा ! ही तुला पहिली सुचना देतों कीं, तूं दारू पिण्याचें सोडून दे, हें तूं न ऐकलेंस तर पुन्हा तुला सूचना देईन, ती पण जर न जुमानिलीस तर तुझें नशीब ! '

"मी धडपडून जागा झालों आणि श्रींच्या तसबिरीपुढें नमस्कार घालून शपथ वाहिली कीं, "बाबा ! यापुढें मी दारूला शिवणार नाहीं."

"माझ्या मित्रमंडळीला मी दारू पिण्याचें सोडल्याचें ऐकून व पाहून कौतुक वाटलें, आणि ती मी प्यावी म्हणून आपआपल्या परीनीं त्यांनीं पराकाष्ठा केली, परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, इतक्या वर्षांच्या संवईमुळें दारू पिण्याचा जो अनिवार्य मोह उत्पन्न व्हावयाचाच असें सांगतात, तसा मोह मला मुळींच झाला नाहीं. हें केवळ साईमाऊलीच्या कृपेचेंच फळ, असें मला खात्रीपूर्वक वाटतें."

"या प्रमाणें पंधरा दिवस गेले. त्याच महिन्याच्या पंधराव्या तारखेस आमच्या आफिसांत इलेक्ट्रिक लाईटच्या तारा वगैरे टाकून काम पुरें होऊन लाइटचें उद्घाटन व्हावयाचें होतें आणि त्याप्रमाणें सध्याकाळीं सर्व ठिकाणीं प्रकाश पडून सर्वांना आनंद झाला."

"आमच्या हपिसाचा साहेब त्याच घराच्या वरच्या मजल्यावर आपल्या मुलांलेकरांसहित राहात होता. त्याचे दोन मुलगे दुसऱ्याच दिवशीं पांचगणीच्या शाळेंत शिकण्यासाठीं त्या शाळेच्या बोर्डिंगांत राहावयाला जाणार होते. सबब त्यांच्या गमनाप्रीत्यर्थ शुभेच्छा प्रदर्शित करण्याकरितां व इलेक्ट्रिक प्रकाश आल्याच्या आनंदाकरितां आम्हा दोघा निवडक कारभाऱ्यांना साहेबानें आपल्या दिवाणखान्यांत वर नेलें."

" तेथें रिवाजाप्रमाणें व्हिस्की-ब्रांडीच्या व सोडयाच्या बाटल्या आणून प्रत्येकापुढें रिकामी ग्लासें ठेवून, ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें "Say when" (दारु ओततांना आपल्या इच्छेप्रमाणें ग्लासांत भरल्यावर, "Thank you that will do" ( आपले आभार आहेत, पुरे ) वगैरे मंत्रोच्चार सुरू झाले. मी साहेबाला आग्रह न करण्याचें विनविलें, आणि सांगितलें कीं, दारू न पिण्याची शपथ वाहिली होती. साहेब म्हणाला कीं "आमच्यांत देखील अशा शपथा घेण्यांत येत असतात, परंतु त्या पाळतांना अशा शुभप्रसंगीं Taste (स्वाद घेणें) केल्यानें शपथेला मुळींच बाध येत नाहीं असें आम्हीं समजतों."

" मला तें कसेंसेंच वाटलें. माझ्या समोरचें दारूचें ग्लास पिण्याला मन घेईना; माझ्या मित्रानें माझ्या मनांतला प्रकार जाणला. जरी तो देखील एक साईभक्त होता, तरी त्याला पिण्याचा विधिनिषध नसल्या कारणानें त्यानें आपल्या पुढयांतील ग्लास गट्ट केला. साहेबानें आपला ग्लास तोंडाला लावला लावला व वर सांगितल्याप्रमाणें मला आग्रह केला. मीं ग्लास उचलला. आतां काय करावें. साहेबाला वाईट वाटूं नये व आपल्या शपथेचा भंग होऊं नये हें व्हावें कसें या विवंचनेंत असतां एकाएकीं घरांतल्या सर्व बत्त्या गेल्या. तेव्हां मेन स्वीच ( म्हणजे मुख्य चावी ) पाशीं जाऊन कोणी खेळत असेल असें मानून साहेबानें आपल्या हातां-तलें ग्लास टेबलावर ठेवलें आणि आम्हाला बसावयास सांगून आंधारांत चांचपडत तो दादर उतरून खालीं गेला."

" श्री साईमाऊली प्रसन्न झाली असें वाटून तें हातांतलें ग्लास टेबलाखालीं ओतण्याच्या तयारींत मी होतों; आणि तसें केलें असतां त्या टेबलाखालचें उंची जाजम खराब झालेंच असतें. रस्त्यापलीकडच्या घरांतून त्या खोलींत आलेल्या अंधुक प्रकाशामुळें माझ्या स्नेह्यानें माझ्या चर्येवरून मी काय करणार हें ताडलें आणि जाजम खराब न व्हावें या

सद्‌हेतुनें प्रेरित होऊन तें ग्लास माझ्या हातांतून झट्‌कन् घेऊन स्वतः गट्ट केलें. आणि माझ्यापुढें टेबलावर ठेवलें. ”

“ इतक्यांत प्रकाश पुन्हा येऊन घरांतले सर्व दिवे पेटले. साहेब परत वर आला आणि म्हणाला “.मेन स्विच तर बरोबर होता आणि बत्त्या गेल्या कशा व पुन्हा पेटल्या कशा, हें कसें झालें याचा उलगडा होत नाहीं !”

“ माझ्या पुढ्यांतला ग्लास रिकामा झालेला पाहून, आपला शब्द राखून आपल्या मुलाच्या गमनाला याप्रमाणें शुभेच्छा दर्शविलेली पाहून त्यानें माझे आभार मानले. ”

“ आम्ही दोघेजण आपआपल्या घरीं गेलों. त्या रात्रीं बाबांनीं मला स्वप्नांत दर्शन दिलें. आनंदांत होते. आशीर्वाद दिला. मला पण आनंदाचें भरतें आलें. त्याचें वर्णन करणें अशक्य.”

“ त्या दिवसापासून दुखणें गेलें, शरीर सुधरलें, कुटुंबांतल्या सर्व माणसांच्या तोंडावर तजेला आला, सर्व प्रकारच्या सुखसोई घरांत जशा कांहीं आपण होऊन उत्पन्न झाल्या, आणि आनंद होऊन, संसार सुखात. ठेवून माझी बायको थोड्याच वर्षांमागें आम्हा सर्वांस मागें ठेवून श्रींच्या चरणीं लीन झाली.”

“ बाबासाहेब ! वर सांगितलेला प्रकार दुसऱ्या दिवशीं ऐकून माझ्या मित्राच्या मनावर जो परिणाम झाला तो आपल्याला ठाऊक आहेच. काय त्यांची आध्यात्मिक भरारी ! श्री साईबाबांच्या भक्तांपैकी ते एक गुप्त रत्न आहेत हें आपण. जाणत आहांच. नाहीं कांहीं गाजा वाजा ! नाहीं कांहीं पसारा ! आपण भले आणि आपली निष्ठा भली !”

“आपल्या गुरु माऊलीची लीला मी कोणत्या तोंडानें वर्णन करूं ! दृष्टांत कोणाला ! अलबत, त्यापासून माझें प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीत्या कोट

कल्याण झालेंच पण त्या दृष्टांतांपासून अध्यात्मिक उंच उडी कोणी मारली ! "

" हा संसारसागर तरून जाण्यासाठीं बाबारूपि अप्रतिम नावाड्याची कास आपल्यासारख्या सर्वांनी धरलीच पाहिजे. "

रा. आ. तर्खड,

संपादक--श्री साईलीला.

वरील हकीकत वाचून ज्या कुणाला दुर्दैवानें " पेग " घ्यावयाची संवय असेल त्यानें श्रींच्या चरणीं मन लावून ती हानिकारक संवय सोडून द्यावी. श्री साईबाबा सर्व समर्थ आहेत आणि ही दुष्ट संवय सोडून देण्याला कशी काय प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत करतील याचा जरूर अनुभव घ्यावा अशी त्यांना लेखकाची अत्यंत नम्र विनंति आहे.

वांद्रें, ता. ११.<br>अक्टोबर १९३१ }

—संपादक.

# अनुभव

रा. गणपतराव हे एक प्रसिद्ध परभू घराण्यांतले गृहस्थ आहेत. खार ( श्री लक्ष्मीनगर ) येथें ते राहत आहेत. त्यांच्या कुटुंबातील लहान-थोर सर्व माणसें श्रद्धाळू व स्वधर्मपरायण आहेत.

सुमारें १७।१८ वर्षांमागें त्यांची कुटुंबीय व इतर स्नेही मंडळी मिळून २५।३० माणसें श्री साईबाबांच्या दर्शनासाठीं शिरडीस गेलीं होतीं. मे महिन्याचे ऐन उन्हाळ्याचे ते दिवस असल्यामुळें व केवळ कै. साठ्यांचाच वाडा त्यावेळीं उताऱ्यासाठीं असल्यामुळें त्यांचे बरेच हाल झाले होते.

अनेक साधुसंतांच्या तसबिरी घरांत आहेत, त्यांत श्री साईबाबांची पण एक तसबीर आहे, तरी श्री साईबाबांची खास अशी पूजा त्यांच्या घरीं नाहीं, अशी वस्तुस्थिति त्यांच्या घरीं सध्या आहे.

गेल्या मंगळवार ता. २० अक्टोबर रोजीं पहांटेस श्रीयुत गणपत-रावांना एक स्वप्न पडलें. त्यात एक आकृति त्यांच्या नजरेस पडली. या आकृतीचें स्पष्ट रूप त्यांना आठवत नाहीं, ती आकृति त्यांना म्हणाली " अरे ? तूं चिंता कां करतोस ? शिरडीस जा ! तेथें साईबाबा मशिदींत बसला आहे त्याचे पाय घट्ट धर. तो तुझी मानसिक व शारीरिक आपत्ति दूर करील ! "

गणपतराव त्या आकृतीला म्हणाले " शिरडीस साईबाबा आहेत कोठें ? त्यानीं तर केव्हांच समाधि घेतली आहे." तेव्हां श्रीसाईबाबा प्रत्यक्ष प्रकट होऊन म्हणाले " अरे ! शिरडीस मी मशिदींत बसलों आहें, गेलों नाहीं. मला येऊन भेट ! " गणपतरावानीं आनंदानें श्री साईबाबांपुढें लोटांगण घालून त्यांचें वंदन केलें.

पुढील हकीकत गणपतरावांच्या तोंडचीच येणेंप्रमाणें:—"इतक्यांत जागा झालों, पहांट झाली होती. बरें वाटलें. हळू हळू इतर मंडळी जागी झाली. मुखमार्जन करून स्वप्नाची हकीकत इतरांना सांगीतली. कारण या प्रमाणें पडलेलीं स्वप्नें एकमेकांस सांगावयाचीं असा आमच्या घरचा प्रघात आहे.

सर्वांनीं मला तांबडतोब शिरडीस जाण्याचें सुचविलें. दुसऱ्या दिवशीं दसरा असून श्रीसाईबाबांची पुण्यतिथि आहे याची सर्वांना आठवण होऊन स्वप्नाचें कौतुक वाटलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं जवळच रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांचे घरीं सान्ताक्रूझ येथें गेलों. तेथें त्यांच्या कुटुंबानें ते आदल्याच दिवशीं शिरडीस गेल्याचें कळविलें आणि त्या दिवशीं सुंदरराव नवलकर हे जावयाचे आहेत असें पण मला सांगितलें.

आतां संध्याकाळ होऊन रात्रीचा सुमार, अशा वेळीं मुंबईस जाऊन नवलकरांना त्रास द्यावा हें उचित वाटेना. मनाचें आंदोलन सारखें चाललें होतें कीं, जावें कीं न जावें. मला दम्याची व्यथा आहे. शिरडीचा लांबचा पल्ला पडला. त्यांत नदीला पूर आल्याचें समजलें, कुणाची सोबत पहावी ती मिळेना. अशा विवंचनेंत दुसरा म्हणजे बुधवारचा दिवस गेला. घरच्या मंडळीचा आग्रह पडला कीं शिरडीला जावेंच. तेव्हां मनाचा निर्धार करून गुरुवारीं सकाळीं अलाहाबाद एक्स्प्रेस पकडून, बारा वाजतां मनमाडाहून दौंडाकडे जाणारी गाडी मिळून, कोपरगांवास उतरून टांगा केला. टांगेवाल्यानें मला हैराण केलें. अड्ड्यावर टांगा सोडला. तेथून नदी दूर आहे. नदीला पूर आला होता. नांव चालू होती. तिच्यांत बसून पैलतीरास गेलों. तेथें मोटर मिळून वीस पंचवीस मिनिटांत शिरडीस श्री. प्रधान, सुंदरराव वगैरे मित्र मंडळीस भेटलों. स्नान केलें. समाधीचें दर्शन घेतलें. नंतर मशिदींत जाऊन श्रींच्या तसबिरीपुढें बसून सर्व सुख दुःखें निवेदन केलीं. ज्याचा त्याचा अनुभव हा त्याच्याच पाशीं असावयाचा; सांगून तो इतरांना कळणें कठीण. सारांश अत्यंत बरें वाटलें. नंतर सर्वांबरोबर भोजन झालें.

रात्रीं रथोत्सव होता. थोडें एकनाथी गारूड झालें. त्या रात्रीं दम्याचा जोर झाला. नंतर चांगली झोंप लागली. दुसऱ्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं पुष्कळ हुशारी वाटली. शनिवारीं सकाळीं बैलगाडींतून मंडळी-बरोबर निघालों; मनमाड स्टेशनावर फराळ केला. दूध प्यावयाची हिंमत होत नव्हती तें प्यालों, आणि संध्याकाळीं खार येथें घरीं आलों. दम्याचा यत्किंचित् त्रास झाला नाहीं, शारीरिक व मानसिक हुषारी वाटत आहे. हीं सर्व श्री साईबाबांच्याच कृपेचीं फळें आहेत यांत संशय नाहीं.

श्री गणपतराव हे अत्यंत मिडस्त स्वभावाचे आहेत. आपला अनुभव प्रसिद्ध होऊन आपल्या नांवाचा निष्कारण गाजावाजा होऊं नये अशी त्यांची खास इच्छा असल्याकारणानें त्यांचें पूर्ण नांव येथें प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं.

वांद्रें ता. २२ अक्टोबर १९३१. —संपादक.